## कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्य उध्दार आणि शिक्षणविषयक चळवळ स्वरुप कार्य : एक चिंतन

**प्रा. डॉ. सुनिलदत्त गोडसे** सहयोगी प्राध्यापक (मराठी) कला, वाणिज्य, व विज्ञान महाविदयालय ओंदे, ता.विक्रमगड जि. पालघर

---

प्रस्तावना- कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'रयत' आणि पिपल्स ऐज्युकेशन सोसायटी च्या माध्यमातुन जे रचनात्मक कार्य उभे केले त्याव्दारे लाखो दीन -दलीत , अस्पृश्य, पिडीत, बहुजनांच्या जीवनातील अंधकार नाहिसा होवुन त्यांच्या जिवनात अस्मितेचा, स्वाभिमानाचा, आत्मभानाचा, स्वावलंबाचा तेजोमय प्रकाश निर्माण केला. दीन, दलीत – दुबळयांचे युगानयुगाचे दु:ख नाहिसे केले. याअर्थाने त्यांचे हे कार्य युगप्रवर्तक ठरले. त्यांच्या या समर्थ कार्यामुळे नवराष्ट्राची उभारणी समर्थपणे होवु शकली.

पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समकालीन होत. दोघांनीही आपल्या बुध्दीच्या जाणीव-नेणीवेच्या पातळीवरुन तत्कालीन समाजातील दु:ख, दैन्य, समस्या जाणल्या होत्या. त्यावर उपाय केल्याशिवाय समाज व राष्ट्र प्रगतीपथावर व मानवतेच्या पातळीवर येणे शक्य नाही. याची पुरेपुर समज आल्याने दोघांनीही आपल्या कार्याची दिशा निश्चित करुन समाजातील अपप्रवृत्ती विरोधात लढा उभारला. कर्मवीरांनी वसतिगृहे व शाळा यांच्या माध्यमातुन जातीविरहीत स्वावलंबी समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ही सत्यप्रणाली आपल्या संस्थेसाठी आचारली. तर डॉ. आंबेडकरांनी शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा ही त्रयी आपल्या अनुयायांना दिली. त्याचा यथोचित परिणाम समाज उध्दारण्यात झाला. ज्या कालखंडात या द्वयींचे कार्य चालत होते. तो काळ प्रचंड रुढी, परंपरा, अस्पृश्यता, अज्ञान, दारिद्रयता यांच्या गाळात रुतलेला होता, अशा हया रुढीग्रस्त समाजाला आत्मभान देवून मुख्य प्रवाहात आणण्याचे युग प्रवर्तक कार्य हया दोघांनी केले.

कर्मवीरांच्या कार्यापुढे म. फुले व राजर्षी शाहू महाराजांचे कार्य दीपस्तंभासारखे उभे होते. जणू त्यांचीच प्रेरणा त्यांच्या कार्यामागे होती असे दिसून येते. स्पृश्य-अस्पृश्य, दीन-दलीत, गरीब-बहुजनांच्या मूला-मूलींना जात-पात विरहीत शिक्षण देता यावे या हेतूने कर्मवीरांनी सन 1919 मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सुरुवातीला या संस्थेद्वारे वसतिगृहाची स्थापना करुन या वसतिगृहातून कोणातच धर्म-जात भेद न मानता विद्यार्थी एकत्र राहून - एकत्र जेवून शिक्षण घेत होते. अशाप्रकारचा सर्व जातीधर्माचे विद्यार्थी एकत्र राहून शिक्षण घेणारे बहुधा देशातील पहिलाच प्रयोग होता. कारण जेव्हा या वसतिगृहाचे नामकरण महात्मा गांधींच्या हस्ते 1927 मध्ये "शाहू बोर्डींग हाऊस सातारा" असे करण्यात आले तेव्हा गांधीजींनी कबुली दिली की, सर्व जाती - धर्माच्या मुलामुलींसाठी मी साबरमतीला आश्रम उघडून बसलो आहे. परंतु त्या ठिकाणी कोणी येण्यास तयार नाही. इतकी अस्पृश्यता समाजाच्या मानगुटीवर बसली आहे. त्यादृष्टीने तुमचे हे कार्य अनमोल आणि क्रांतीकारक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सवर्ण समाजाविरोधात लढा उभारला. आपल्या कार्याची सुरुवात करतांना दलीतांना अमानवतेचा जगण्यातुन सुटका करण्यासाठी महाड येथे 1927 मध्ये 'चवदार तळयाचा सत्याग्रह' तर दलीतांसाठी मंदिरे खुली व्हावीत यासाठी 1931 मध्ये नाशिक येथे काळाराम मंदिर सत्याग्रह केला. इतकेच नव्हे ज्या धर्मात माणसांना (अस्पृश्यांना) माणसांसारखी वागणुक दिली जात नाही. त्या धर्माचा त्याग केला आहे पाहीजे असा विचार मांडून 1956 मध्ये (दिक्षा भूमीवर) 2 लाख अनुयायांच्या साक्षीने हिंदु धर्माचा त्याग करुन बौध्द धर्मात प्रवेश केला. बाबासाहेबांचे हे कार्य अपृश्यता उध्दारकरण्याचा कार्याच्या दृष्टीने क्रांतीकारक म्हणावे लागले. दलीतांना राजकारणात - सत्ताकारणात सहभाग घेता यावा यासाठी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना करुन दलीतांसाठी वेगळे आरक्षित मतदारसंघाची मागणी केली. शिक्षणाशिवाय या दलीत अस्पृश्य समाजाचा उधार होणे शक्य नाही. हे बाबासाहेबांनी ओळखले होते म्हणुन त्याच्याकरिता पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन औरंगाबाद येथे मिलींद महाविदयालयाची स्थापना केली. तसेच मुंबई येथे सिध्दार्थ महाविदयालयाची स्थापना करुन गरिब दलीत समुदायास शिक्षणाव्दारे मुख्य प्रवासात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे प्रयत्न त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते.

डॉ. आंबेडकर हे भाऊरावांच्या शिक्षणाविषयक आणि अस्पृश्योध्दारक कार्याचे चाहते होते. एकदा आंबेडकर 1928 साली आपल्या कोर्टकचेरीच्या कामानिमित्त सातारला आले असता त्यांना भाऊरावंच्या कार्याविषयीची माहिती मिळाली. आंबेडकरांनी भाऊरावांचे हे कार्य पाहण्यासाठी आपला एक दिवसाचा मुक्काम वाढवून भाऊरावांच्या वसतिगृहाला भेट दिली. या वसतिगृहात सर्व जाती- धर्माची मुले एकत्र नांदतात - राहतात हे पाहुन डॉ. आंबेडकर प्रभावित झाले. त्यांनी भाऊरावांना आपले हे कार्य असेच पुढे चालु ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच भाऊरावांच्या वसतिगृहासाठी 20 रुपयांची देणगी दिली.

कर्मवीर भाऊराव पाटील हे सत्यशौधक समाजाचे कार्यकर्ते होते. त्यामुळे जिथे संधी मिळेल तिथे भाऊराव जातीभेद, अस्पृश्यता, जुन्या अनिष्ट रुढी, यांना कडाडुन विरोध करत असत. जाती भेद हे राष्ट्र हितांविरोधात काम आहे. असे ते मानित म. फुले व शाहु महाराज यांचे कार्य भाऊरावंनी नेटाने पुढे नेले. गोरगरिबांना शिक्षण सक्तीचे मोफत किंवा स्वस्त मिळाले पाहिजे. अशी भाऊराव व डॉ. आंबेडकरांची धारणा होती. त्यामुळे भाऊरावांच्या शाळा आणि महाविदयालयात गरिब- दलीतांसाठी मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध होती.

समारोप- कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक व अस्पृश्यता निवारण कार्यात एकसमान सुत्र जाणवते. शिक्षणाशिवाय समाजात बदल अशक्य आहे. त्यानुसार या दोघांनाही हयातभर काम केले. त्यांचा फायदा आपल्या अनुयायांना झाला. कर्मवीरांनी आपले शिक्षणाविषयी कार्य करतांना ग्रामीण जनता आपल्या डोळयापुढे ठेवली होती.या दृष्टीने त्यांच्यापुढे महात्मा गाधींचा आदर्श होता. तर डॉ. आंबेडकरांनी आपल्या दलीत बाधवांना शहराकडे चला अशी हाक दिली त्याचा फायदा दलीतांची सर्वांगीण प्रगती होण्यामध्ये झाला असे आज दिसुन येते.

संदर्भ –1) रयतेचे कर्मवीर- संपादन लांडगे मनोहर

2) नवभारत दैनिक- दि. 30/09/1950

3) मालोजीराव नाईक निंबाळकर यांना लिहलेले पत्र दि. 25/08/1945

4) कर्मवीरायण -पाटील अजित

5) कर्मवीर भाऊ पाटील – भोसले द. ता.

6) आधारवड- नाईकवाडे अशोक

7) डॉ. बाबासाहेब आंबेडेकर – कीर धनंजय